Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

UGC Approved Monthly Journal

VOL-IV | ISSUE-XI | Nov. | 2017

**Address**
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

**Email**
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

**Website**
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा अभ्यास

**डॉ. महादेव सदाशिव डिसले**
सहाय्यक प्राध्यापक,
शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बार्शी

## १. प्रास्ताविक

व्यक्तिला यशस्वी जीवन जगण्यासाठी केवळ बुद्धिगुणांक उच्च असून चालत नाही तर त्याला भावनिकतेचीही जोड असणे गरजेचे आहे, असा सिद्धांत पुढे येऊ लागला. म्हणजेच बुद्धिमत्ता साम्राज्याला सर्जशीलतेनंतर दुसरा हादरा भावनिक बुद्धिमत्तेने दिला.

भावनिक बुद्धिमत्तेचा विचार करत असताना प्रथम आपणास भावना या घटकाचा विचार करावा लागतो. व्यक्तिमध्ये अनेक भावना निर्माण होतात. त्यामध्ये सुख, दुःख, आनंद, चीड, द्वेष, नैराश्य अशा अनेक भावना वारंवार निर्माण होतात. या भावनांपासून कोणताच व्यक्ती अलिप्त राहू शकत नाही.

आजच्या विद्यार्थ्यांची संपादणूक क्षमता शंभर टक्क्यांपर्यंत जाऊन पोहोचली आहे. परंतु तो आज लहान-सहान गोष्टींवरून वाईट मार्गाला जात आहे. म्हणजेच त्याची बौद्धिक बुद्धिमत्ता किंवा बुद्धिमत्ता गुणांक वाढला असला तरी भावनांचा म्हणावा तसा विकास झालेला दिसून येत नाही. आज विद्यार्थ्यांमध्ये नैराश्याची भावना निर्माण होत आहे.

नैराश्य हे अनेक गोष्टींमुळे येतं. त्यामध्ये, कधी आपण कोणाकडून फसवले गेलो, खूप साऱ्या आर्थिक अडचणींना तोंड द्यावं लागलं, गोष्टी मनासारख्या झाल्या नाहीत, जवळच्या नात्यात खूप ताण निर्माण झाले, नातं तुटलं, कुटुंब विभक्त झालं, एकाकी पडल्यासारखं वाटलं इत्यादी घटनांमुळे मनाला वाईट वाटते, आपली निराशा होते, काही गोष्टी आपल्या हातातून कायमच्या निसटल्या अशी सल मनामध्ये निर्माण होते. या गोष्टींमुळे विद्यार्थ्यांमध्ये नैराश्य निर्माण होते. नैराश्याचा परिणाम त्यांच्या व्यक्तिगत जीवनावर होतो.

विद्यार्थ्यांचा वयोगट १५-१७ वर्ष हा मानसशास्त्रीयदृष्ट्या अशांततेचा कालावधी म्हणून सांगितला जातो. या वयातच विद्यार्थ्यांच्या शरीरामध्ये अंतर्गत व बाह्य बदल होताना दिसतात व त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या भावनेवर होतो. भावनेला योग्य दिशा मिळाली तर विद्यार्थ्यांचा विकास होतो. परंतु प्रत्येक विद्यार्थ्याच्या भावनेला योग्य दिशा मिळेलच याची शाश्वती देता येत नाही. जर भावनांना योग्य दिशा प्राप्त झाली नाही तर विद्यार्थ्यांवर समाजाचा, तसेच टी.व्ही., इंटरनेट, मित्र यांचा अयोग्य परिणाम होताना दिसत आहे.

वरील सर्व गोष्टींचा विचार केला असता एवढेच म्हणता येईल की आजचा विद्यार्थी अभ्यासात जरी १०० टक्के गुण मिळवित असला तरी आणि साक्षर जरी झाला असेल परंतु भावनिक साक्षरता त्याच्यामध्ये रूजली नाही. म्हणून भावनिक साक्षरता निर्माण करण्याची म्हणजे विद्यार्थ्यांचा भावनिक विकास करण्याची गरज आहे.

## २. भावनिक बुद्धिमत्तेची व्याख्या

*'आपल्यातील व इतरांमधील भावनिक संबंध नीट जुळावेत यासाठी स्वतः प्रेरित व्हावे म्हणून स्वतःच्या व इतरांच्या भावना ओळखण्याकरिता जी पात्रता लागते, ती म्हणजे भावनिक बुद्धिमत्ता होय'* - डॅनियल गोलमन

**३. भावनिक बुद्धिमत्तेचे घटक**

**अ) आत्मप्रचिती** भावनांची जाणीव, अचूक आत्मपरीक्षण, आत्मविश्वास

**ब) आत्मनियमन** आत्मनियंत्रण, विश्वासार्हता, जबाबदारीची जाणीव, अनुकूल क्षमता, नवोपक्रमशीलता

**क) प्रेरणा** संपादन ऊर्जा, बांधिलकी, पुढाकार व पर्याप्तता

**ड) समानानुभूती** इतरांचे आकलन, सेवाभावाचा उद्‌गम, वैविध्याचा समतोल, इतरांचा विकास, राजकीय भान

**इ) सामाजिक कौशल्य** प्रभाव, संघर्ष व्यवस्थापन, नेतृत्त्व, समान परिवर्तनाचा उत्प्रेरक, संप्रेषण

भावनांचा विकास करण्यासाठी आज शालेय स्तरावर म्हणावे तसे प्रयत्न केले जात नाहीत. त्यासाठी संशोधन होणे गरजेचे आहे. कारण भावनांचा विद्यार्थ्यांशी जवळचा संबंध आहे. भावनेवरच सर्व विश्व टिकले आहे. यासाठी प्रथम भावनिक बुद्धिमत्तेचा शोध घेणे गरजेचे आहे.

**५) संशोधनाची उद्दिष्टे**

१. भावनिक बुद्धिमत्तेची संकल्पना अभ्यासणे.

२. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा शोध घेणे.

**६) संशोधन कार्यपद्धती**

**अ) संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे.

**ब) नमुना निवड**

प्रस्तुत संशोधनासाठी बार्शी तालुक्यातील ४१ उच्च माध्यमिक शाळांपैकी २० उच्च माध्यमिक शाळांची निवड संभाव्यतेवर आधारित सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीतील लॉटरी पद्धतीने करण्यात आली. निवडलेल्या २० उच्च माध्यमिक शाळेतील इयत्ता १२ वी च्या वर्गातील ३०० विद्यार्थ्यांची निवड संभाव्यतेवर आधारित सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीतील लॉटरी पद्धतीने करण्यात आली. विद्यार्थ्यांची सर्वेक्षण पद्धतीने भावनिक बुद्धिमत्ता शोधण्यात आली.

**क) संशोधनाची साधने**

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्ता शोधण्यासाठी डॉ. मंगल यांची भावनिक बुद्धिमत्ता शोधिका (Mangal Emotional Intelligence Inventory (MEII) चा उपयोग करण्यात आला आहे.

**७) माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

एकूण ३०० विद्यार्थ्यांना प्रथम डॉ. मंगल यांची भावनिक बुद्धिमत्ता शोधिका देण्यात आली. त्या विद्यार्थ्यांकडून प्राप्त चाचणीचे गुणांकाच्या आधारे अर्थनिर्वचन करण्यात आले.


सारणी क्र. १

विद्यार्थ्यांना मिळालेल्या गुणांची वारंवारिता दर्शविणारी सारणी


| वारंवारिता | मुले | वारंवारिता | मुली | एकूण | दर्जा |
|---|---|---|---|---|---|
| ८८ व त्यापेक्षा जास्त | ०० | ९० व त्यापेक्षा जास्त | ०० | ०० | **उत्तम** |
| ७५-८७ | ०० | ७७-८९ | ०० | ०० | **चांगला** |
| ६१-७४ | ५४ | ६३-७६ | ५५ | १०९ | **मध्यम** |
| ४८-६० | ८१ | ४९-६२ | ५५ | १३६ | **बरा** |
| ४७ व त्यापेक्षा कमी | २७ | ४८ व त्यापेक्षा कमी | २८ | ५५ | **वाईट** |
| | १६२ | | १३८ | ३०० | |

आलेख क्र. १

मुलांना मिळालेल्या गुणांची वारंवारिता दर्शविणारा आलेख



**आलेख क्र. २**
**मुलींना मिळालेल्या गुणांची वारंवारिता दर्शविणारा आलेख**




## ८) निष्कर्ष

१) उत्तम व चांगली भावनिक बुद्धिमत्ता ही एकाही विद्यार्थ्याची दिसून आली नाही.
२) मध्यम दर्जाची भावनिक बुद्धिमत्ता १०९ विद्यार्थ्यांची दिसून आली.
३) बऱ्या दर्जाची भावनिक बुद्धिमत्ता १३६ विद्यार्थ्यांची दिसून आली.
४) वाईट दर्जाची बुद्धिमत्ता ५५ विद्यार्थ्यांची दिसून आली.
५) जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्ता ही मध्यम व बऱ्या दर्जाची दिसून आली.
६) मध्यम दर्जाची भावनिक बुद्धिमत्ता ही मुलांपेक्षा मुलींमध्ये जास्त दिसून आली.
७) बऱ्या दर्जाची भावनिक बुद्धिमत्ता ही मुलींपेक्षा मुलांची जास्त दिसून आली.
८) वाईट दर्जाची भावनिक बुद्धिमत्ता ही मुलांपेक्षा मुलींमध्ये जास्त दिसून आली.
९) उत्तम व चांगल्या दर्जाची भावनिक बुद्धिमत्ता ही एकाही विद्यार्थ्याची दिसून आली नाही.

## ९) शिफारशी

१) उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या बौद्धिक बुद्धिमत्तेकडे जास्तीत जास्त लक्ष दिले जाते. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेकडेही शिक्षकांनी व पालकांनी लक्ष द्यावे.
२) भावनिक बुद्धिमत्ता वाढविण्यासाठी शाळा वा कनिष्ठ महाविद्यालयांनी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथसूची -**

१. करंदिकर, सुरेश (२०१०). *अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र,* कोल्हापूर : फडके प्रकाशन.
२. करंदिकर, सुरेश (२००७). *शैक्षणिक मानसशास्त्र*, कोल्हापूर : फडके प्रकाशन.
३. सिंग, दलिप (२००८). *भावनिक बुद्धिमत्ता - एक व्यावसायिक मार्गदर्शन*, पुणे : डायमंड पब्लिकेशन्स.
४. मुळे रा. शं., उमाटे वि. तु. (१९८७). शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ संच निर्मिती मंडळ.